सन २०१४-१५ या वर्षाकरीता अंगण वाडी केंद्राना औषधी संच (मेडिसीन कीट) पुरवठा करण्यास मंजूरी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१४/प्र.क्र.१७९/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

वाचा :- १) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.मबाविआ/एबाविसेयो/मे.किट/का-७/२०१४-१५/३४९, दिनांक ११.०६.२०१४ चे पत्र.

२) उपआयुक्त (अंगणवाडी), महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.एबाविसेयो/का-७/मेडीसीनकिट/१२५०/२०१४, दि.८.१०.२०१४ व दि.२.१२.२०१४ चे पत्र.

प्रस्तावना :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत प्रत्येक वर्षी औषधी संचाचा पुरवठा करण्यासाठी प्रति अंगणवाडी केंद्र रु.६००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र रु.३००/- इतका निधी उपलब्ध करुन दिला जातो. या निधीतून ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी व मिनी अंगणवाडी केंद्रासाठी औषधी संच खरेदी पुरविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील कार्यरत अंगणवाडी केंद्र व मिनी अंगणवाडी केंद्र यांना मेडिसीन किट पुरविण्याच्या अनुषंगाने आयुक्तांकडून ई-निविदा प्रक्रिया राबवण्यित येऊन त्याद्वारे सर्वात कमी दर असलेल्या प्रिस्ट फार्मास्युटीकल्स अमरावती यांचेकडून मेडिसीन किट "A" (अंगणवाडी केंद्रासाठी) दर रु.५९७.३७ (सर्व कर व वाहतुक खर्च धरुन) मेडिसीन किट "B" (मिनी अंगणवाडी केंद्रासाठी) दर रु.२९९.३१ (सर्व कर व वाहतुक खर्च धरुन) या दराने औषधी संच खरेदी करण्यासाठी रु.६,१२,४८,८१५/- एवढा निधी आवश्यक असून त्यापैकी ६०% प्रमाणे उपलब्ध असलेला रु.३,६९,०७,०२०/- (अक्षरी रुपये तीन कोटी एकोणसत्तर लाख सात हजार वीस फक्त) इतका निधी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर खालील अटींच्या अधिन राहून मेडिसीन किट खरेदी करावी. यासाठी लागणारा उर्वरीत निधी हा वित्त विभागाकडून ४०% निधी उपलब्ध झाल्यानंतर तथा सदर निधी खर्च करण्यास वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर (अनौपचारिक संदर्भ प्राप्त झाल्यानंतर) उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. औषधी संच खरेदी करतांना खालील अटी विचारात घ्याव्यात :-

i) औषधी संचाची खरेदी शासकीय पध्दतीनुसार व शासकीय नियमाप्रमाणे करण्यात यावी. पुरवठा करावयाच्या औषधी संचाचे दर बाजार भावापेक्षा जास्त नाही याची खात्री आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी करावी.

ii) औषधी संच पुरविण्याचेवेळी औषधांची Manufacutaring Date ३ महिन्यापूर्वीपर्यंतच्या कालावधीतील असावी व Expiry Date १८ महिन्यांच्यापेक्षा कमी नसावी.

iii) औषधी संचातील औषधाची यादी सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे नमूद करण्यात आलेली आहे.

iv) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी औषधी संचाचा पुरवठा विहित नमुन्याप्रमाणे (Sample) व दर्जाप्रमाणे असल्याची खात्री करुन त्याबाबतचा अहवाल, आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना सादर करावा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी एकत्रित अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करावा. दर्जाबाबत आरोग्य विभाग वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडून तपासणी करावी.

v) केंद्र शासनाने या संदर्भात दिलेल्या सूचना व मार्गदर्शकांचे पालन करावे. सर्व औषधे, औषधी संच (किट) च्या स्वरुपात द्यावेत.

vi) सदर वस्तूंचा पुरवठा प्रकल्प स्तरावर करण्यात यावा. सदरचे औषधी संच, अंगणवाडी केंद्र स्तरावर वेळेवर पोहचविले जातील याची जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील. औषधी संचामध्ये दोष असणार नाही याची जबाबदारी आयुक्त कार्यालयाची राहील.

vii) सदर वस्तूंचा पुरवठा प्रकल्प स्तरावर झाल्याची पोच मिळाल्यानंतरच देयके अदा करण्यात यावीत.

viii) सदर वस्तूंचे वाटप, पुरवठा व विनियोगामध्ये काही अनियमितता झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**ब) ग्रामीण व आदिवासी प्रकल्प :-**

**(१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा (ग्रामीण व आदिवासी प्रकल्प)** लेखाशिर्ष मागणी क्र. एक्स-१ २२३६, पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना - ग्रामीण (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२३ व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने (२२३६००७२) (स्थानिक क्षेत्र) ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)

**(२) राज्य शासनाचा १०% हिस्सा (ग्रामीण व आदिवासी प्रकल्प)** लेखाशिर्ष मागणी क्र.एक्स-१, २२३६ पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना ग्रामीण (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२३ व २६१ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदाने (२२३६ १३७३) स्थानिक क्षेत्र, ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)

**ब) नागरी प्रकल्प :-**

**१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - लेखाशिर्ष :-** मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना- नागरी

(०१) (०३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (केंद्र पुरस्कृत योजना ९० टक्के) (२२३६०५११९) २१ पुरवठा व सामग्री

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (नागरी) (०१) (०८) एकात्मिक बाल विकास सेवा योजना - अंमलबजावणी व प्रशासकीय खर्च (१०% राज्य हिस्सा) (२२३६१३८२) २१ सामग्री व पुरवठा या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ ४८१/१४/व्यय-६, दिनांक १९.७.२०१४ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१४/प्र.क्र.२२१/का.६, दिनांक २१.७.२०१४ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), मवबावि, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)

निर्गमित
दिनांक

शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबावि-२०१४/प्र.क्र.१७९/का.६, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ सोबतचे विवरणपत्र

## Medicine Kit for Anganwadi Centre

| Sr. No. | Product Name and Pharmacopoeia | Strength | Qty. / Per Kit | Rate per Kit. Rs. |
|---|---|---|---|---|
| | Supply of 'PRIEST' brand Medicine Kits for Anganwadis consisting following items | | | |
| 1. | Tab Paracetamol IP 1996 | 500 mg | 1 x 430 Tab | Rs.597.37 per kit. |
| 2 | Sy. Paracetamol IP 1996 | 125 mg/5ml | 1 x 500 ml | |
| 3 | Tab Mebendazole IP 1996 | 100 mg | 1 x 450 Tab | |
| 4 | Benzyl Benzoate Application IP 1996 | 25% W/W | 1 x 500 ml | |
| 5 | Chloramphenicol Eye Ointment IP 1996 | 1% W/W | 3.05 gm x 10 Tubes | |
| 6 | Gentain Violet | 2% W/V | 100 ml x 1 Btl | |
| 7 | Sulphacetamide Sodiuum Eye Drop IP 1996 | 10% W/W | 10 ml x 6 vials | |
| 8 | Povidone Iodine USP | 5% W/W | 5 gm x 5 Tubes | |
| 9 | Absorbent Cotton IP 1996 | 400 GM | 400 gm x 1 rolls | |
| 10 | Cotton Bandage Schedule F –II | 5 cm x 5 mtr. | 5 cm X 5 mtr x 1 Dozen | |
| 11 | Booklet in Regional Language for the contents | ----- | 1 Nos. | |

## Medicine Kit 'B' for Mini Anganwadi Centre

| Sr. No. | Product Name and Pharmacopoeia | Pkg. | Qty. / Per Kit | Rate (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1. | Tab Paracetamol IP 1996 | 500 mg | 1 x 250 Tab | Rs.299.31 per kit. |
| 2 | Syp. Paracetamol IP 1996 | 125 mg/5ml | 1 x 250 ml | |
| 3 | Tab Mebendazole IP 1996 | 100 mg | 1 x 125 Tab | |
| 4 | Benzyl Benzoate Application IP 1996 | 25% W/W | 1 x 250 ml | |
| 5 | Chloramphenicol Eye Ointment IP 1996 | 1% W/W | 3.05 gm x 5 Tubes | |
| 6 | Gentain Violet | 2% W/V | 50 ml x 1 Btl | |
| 7 | Sulphacetamide Sodiuum Eye Drop IP 1996 | 10% W/W | 10 ml x 3 vials | |
| 8 | Povidone Iodine USP | 5% W/W | 5 gm x 2 Tubes | |
| 9 | Absorbent Cotton IP 1996 | 400 GM | 200 gm x 1 rolls | |
| 10 | Cotton Bandage Schedule F –II | 5 cm x 5 mtr. | 5 cm X 5 mtr x 6 Rolls | |
| 11 | Booklet in Regional Language for the contents | ----- | 1 Nos. | |

(दि. वा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

* * * * *